सं.फौ.ख.क्र. ६७१/२०२२
सरकार वि. श्रीकृष्ण
सा.क्र. ०१
निशाणी १४ खाली.

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षिदार क्रमांक ०१ चे शपथेवर बयान सरु</u>**

मी याव्दारे शपथेवर निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | :- समाधान काशीनाथ तेलंग, |
| माझे वय | :- ६४ वर्ष, |
| माझा व्यवसाय | :- मजुरी, |
| राहणार | :- बोराखेडी, ता. मोताळा, जिल्हा बुलडाणा. |

**(सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता चव्हाण यांचे मार्फत)**

०१- मी आरोपीला ओळखत नाही. पोलीसांनी मला पंच म्हणुन कुठेही बोलाविले नव्हते. पोलीसांनी माझे समक्ष आरोपीच्या ताब्यातुन काहीही जप्त केले नव्हते. पोलीसांनी माझे समक्ष घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा केला नाही. आता मला घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही नाही व त्यातील मजकुर मला माहिती नाही.

**<u>(साक्षीदार हा सरकारी पक्षाला साहय करत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी त्याला उलटतपासणीमध्ये विचारु शकणारे प्रश्न विचारण्याची तोंडी परवानगी मागीतली - परवानगी देण्यात आली.)</u>**

०२- हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी मला दि.१४/०८/२०२२ रोजी आरोपीच्या घरासमोर मौजे खरबडी, ता. मोताळा येथे पुजा किराणा दुकानासमोर पंच म्हणुन बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी छापा टाकला असता आरोपी हा तेथे देशी दारु बाळगुन अवैधरित्या विक्री करीत होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्या समक्ष छापा टाकला असता आरोपीच्या ताब्यातील एका वायरच्या थैलीतुन प्रत्येकी १८० मिलीच्या १५ बॉटल्स जप्त केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी सदर बॉटल्स जप्त करुन त्यातील एका सिलबंद बॉटली नमुन्यायकरीता राखुन ठेवली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबतचा जप्ती वजा घटनास्थळ पंचनामा पोलीसांनी माझे समक्ष तयार केला होता. हे म्हणणे खरे नाही की, मला पंचनाम्यातील मजकुर वाचून दाखविल्यानंतर मी त्यावर अनु. क्रं. ०२ वर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

सं.फौ.ख.क्र. ६७१/२०२२
सरकार वि. श्रीकृष्ण

**(आरोपीतर्फे साक्षीदाराचा उलटतपास विधीज्ञ एस.जी.सोनुने यांचे मार्फत)**

०३- नाकारला.

**पुर्नःतपास काही नाही.**

दिनांक ०९/०६/२०२५

सा.वा.दा.ब.अ.क.के.
स्वा.

(स.श्री. गायकवाड)
प्र. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्रं.१,
मोताळा, जिल्हा बुलडाणा.

श्रवणोत्तर स्विकृत,
स्वा.

(स.श्री. गायकवाड)
प्र. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्रं.१,
मोताळा, जिल्हा बुलडाणा.